सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग 2019' मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)**

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

## ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम

**(M.Lib. & I.Sc.)**

**शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code) : P16**

# अभ्यासशिबीर मार्गदर्शिका
# २०२३-२४

**संचालक**

**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**

Badhan/AJ_155

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**कुलगुरू :** प्रा.संजीव सोनवणे

**प्रा. नागार्जुन वाडेकर**

प्र. संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक ४२२ २२२

## निबंध विषय लेखन

**प्रा. नारायण बारसे**
ग्रंथपाल व विभागप्रमुख
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
विद्याप्रसारक मंडाळाचे के.जी.जोशी
कला महाविद्यालय, आणि एन.जी.
बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे
ता.जि.ठाणे ४००६०१

**प्रा.कादंबरी मांजरेकर**
ग्रंथपाल,
विद्याप्रसारक मंडाळाचे बी.एन.बांदोडकर
सायन्स महाविद्यालय ठाणे, ता.जि.ठाणे
४००६०१

## शिक्षणक्रम समन्वयक

**डॉ. प्रकाश बर्वे**

उपग्रंथपाल
ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक ४२२ २२२

## निर्मिती

**श्री. विलास बधान**
प्र.प्रमुख, ग्रंथनिर्मिती केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक – ४२२ २२२

© २०२३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- **प्रथम प्रकाशन :** नोव्हेंबर २०२३
- **प्रकाशक** : श्री. भटूप्रसाद पाटील
  प्र.कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
  नाशिक ४२२ २२२

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | विद्याशाखेचा परिचय | २ |
| २. | विद्याशाखेने विकसित केलेले शिक्षणक्रम | २-३ |
| ३. | ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाविषयी | ३-४ |
| ४. | अभ्यास शिबिराविषयी | ४ |
| ५. | निबंधाचे विषय | ४-५ |
| ६. | शोधनिबंध लिहिताना.. | ५-६ |
| ७. | शिबीराचे दैनंदिन वेळापत्रक | ७ |
| ८. | ऐच्छिक विषयाची निवड व प्रकल्प | ८ |

# १. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे या विद्याशाखेत मानवनिर्मित कला, साहित्य या सर्जनशील निर्मितिव्यापाराचा आणि कुटुंबसंस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंतच्या विविध संस्थांच्या रचनांचा, तत्त्वज्ञानाचा व इतिहास-परंपरांचा अभ्यास केला जातो. २१ व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांचा आशय हा मानवकेंद्री असतो. मानवी मूल्यांवर व माणसाच्या विकास-कार्यक्रमांवर भर देणारा आशय हे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांचे वैशिष्ट्य आहे.

विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात अशी :

१. जगभरातल्या विविध संस्कृतींचा, राष्ट्र-राज्यांच्या जडणघडणीचा, इतिहास परंपरांचा, बी.ए., एम.ए. व पीएच.डी. शिक्षणक्रमांचा अभ्यासक्रमात समावेश.

२. मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, इत्यादी मूल्ये, ग्राहकसंरक्षण, पर्यावरण रक्षणादी चळवळी, सार्क, युनो, इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांचे कार्य, स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुनादर्श, जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश आहे.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधीविचारदर्शन, मानवी हक्क, ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.

४. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

५. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.

६. अध्ययनार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि व्यावसायिक यशासाठी लागणाऱ्या पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.

७. स्वयंअध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.

८. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.

९. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, उपग्रह सेवा व वेबमाध्यमांतून अध्ययनार्थ्यांना मार्गदर्शन सेवा अशा विविध अंगांनी अध्ययनार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य.

१०. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

# २. विद्याशाखेने विकसित केलेले शिक्षणक्रम

१. कला स्नातक (बी.ए. पदवी)

२. बी.ए. (जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या)

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी (B.Lib. & I.Sc.)

४. ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (M.Lib. & I.Sc.)
५. एम.ए. (मराठी)
६. एम.ए. (हिंदी)
७. एम.ए. (लोकप्रशासन)
८. एम.ए. (उर्दु)
९. एम.ए. (अर्थशास्त्र)
१०. एम.ए. (इतिहास)

## ३. ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाविषयी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने काळाची पावले ओळखून ग्रंथालय व माहितीशास्त्रातील शैक्षणिक गरजांची पूर्ती करण्यासाठी १९९६ साली या विषयातील ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B. Lib. & I. Sc.) सुरू केला. मराठी माध्यमातून आणि मुक्त शिक्षण पद्धतीद्वारा सुरू झालेला पहिलाच पदवी शिक्षणक्रम म्हटला पाहिजे. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मुंबई अशा सर्व भागांतून या शिक्षणक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाने प्रत्येक अध्ययन सहाय्यता केंद्रावर तीस अध्ययनार्थ्यांना प्रवेश देण्याचे प्रारंभी ठरविले होते; परंतु वाढती मागणी लक्षात घेऊन ही संख्या चाळीसपर्यंत नेण्यात आली. अध्ययन सहाय्यता केंद्राची संख्याही शहाऐंशीर्यंत पोहोचली, आतापर्यंत हजारो अध्ययनार्थ्यांनी या पदवी शिक्षणक्रमाचा लाभ घेतला आहे.

इ.स.२००० पासून विद्यापीठाने पदव्युत्तर पातळीच्या ग्रंथालय व माहितीशास्त्रातील नावीन्यपूर्ण भविष्यकालीन गरजांची पूर्ती करणारा 'ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात' शिक्षणक्रम कार्यान्वित केला आहे. या शिक्षणक्रमासाठी प्रातिनिधिक स्वरूपात महाराष्ट्रात निवडक अध्ययन सहाय्यता केंद्रे सुरू करण्याचे ठरविण्यात आले आणि आता ही संख्या अडतीसपर्यंत पोहोचली आहे. ही अध्ययन सहाय्यता केंद्रे गुणवत्तेच्या दृष्टीने उच्च दर्जाची राहतील व या केंद्रातील अध्ययनार्थ्यांना महाराष्ट्रातील नामवंत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळेल ह्या दृष्टीने विद्यापीठाने या शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विशेष कार्यपद्धतीही ठरविली आहे.

दर्जेदार अध्ययन साहित्याची निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागांतील तज्ज्ञांचे सहकार्य मिळाले असून १८ मुद्रित पुस्तके, दोन कार्यपुस्तिका व प्रतिवर्षी 'ज्ञानगंगोत्री' ह्या त्रैमासिकाचे ४ अंक असे समृद्ध अध्ययन साहित्य विकसित करण्यात आले आहे. शिवाय अध्ययन सहाय्यता केंद्रावर त्या त्या परिसरातील तज्ज्ञांचे दर आठवड्याला मार्गदर्शन आणि वर्षातून एकदा राज्यातील व देशातील नामवंत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचे विशेष अभ्यास-शिबिर हे या शिक्षणक्रमाचे खास वैशिष्ट्य आहे. अद्ययावत माहिती-तंत्रज्ञानाचा विपुल वापर आणि इन्फ्लीबनेट प्रणीत SOUL या ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यासक्रमात समावेश करून या शिक्षणक्रमाची गुणवत्ता जागतिक पातळीवरील शिक्षणक्रमाच्या तोडीची व्हावी यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

# ४. अभ्यास शिबिराविषयी

ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रमातील महत्त्वाचा घटक म्हणजे अभ्यास शिबीर. या शिबीराचा कालावधी ३ दिवसांचा असून अध्ययनार्थ्याने तिनही दिवस पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

अभ्यास शिबीरासाठी अध्ययन सहाय्यता केंद्रावरील २ विषय तज्ज्ञ मार्गदर्शनासाठी उपस्थित राहतात. 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' या विषयातल्या नवनवीन प्रवाहांची माहिती अध्ययनार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, त्यावर अध्ययनार्थी, समंत्रक (अध्यापक) आणि विषय तज्ज्ञ यांच्यामध्ये साधक-बाधक चर्चा घडवून आणणे हा या शिबीराचा प्रमुख उद्देश आहे. त्याचप्रमाणे शोधनिबंध कसा लिहावा, शोधनिबंधाचे सादरीकरण कसे करावे यावरही अध्ययनार्थ्यांना शिबीरामध्ये मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी निबंधविषयांची सूची विद्यापीठाकडून देण्यात येते. ह्या विषयसूचीतून एक विषय निवडून अध्ययनार्थ्याने त्यावर शोधनिबंध तयार करून सादर करावयाचा असतो. हा शोधनिबंध लिहिण्यासाठी अध्ययन सहाय्यता केंद्रावरील समंत्रक अध्ययनार्थ्यांना मार्गदर्शन करतात. अध्ययन सहाय्यता केंद्रावरील (किंवा प्रसंगी अध्ययन सहाय्यता केंद्राबाहेरील) तज्ज्ञ अध्ययनार्थ्यांना मार्गदर्शन करतात. कोणत्या अध्ययनार्थ्यांनी कोणाच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प पूर्ण करावा याबाबत केंद्रसंयोजक निर्णय घेतात.

अभ्यास शिबिरासाठी विद्यापीठाने निर्धारित केलेले शुल्क अध्ययनार्थ्यांनी अध्ययन सहाय्यता केंद्रावर जमा करावे.

# ५. निबंधाचे विषय

(०१) ग्रंथालय शास्त्राच्या पाच सूत्रांचे सद्यस्थितीतील महत्त्व स्पष्ट करा.

(०२) BIBFRAME या मानांकनावर निबंध लिहा.

(०३) डिजिटल स्वरूपातील माहितीच्या जतनाची गरज स्पष्ट करून त्याच्या विविध मार्गांचे विवेचन करा.

(०४) ग्रंथालयामध्ये क्यू आर कोडचा वापर कसा करता येईल हे स्पष्ट करा.

(०५) ऑन्टॉलॉजी, टॅक्सॉनॉमी, फॉक्सोनॉमी (Ontology, Taxonomy, Foxonomy) या संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

(०६) वाचक सल्लागार सेवा (Reader Advisory Services) म्हणजे काय ते सांगून त्याची उदाहरणे द्या.

(०७) निंबस (Knimbus) या डिजिटल ग्रंथालयाच्या व्यासपीठाबद्दल माहिती द्या.

(०८) ग्रंथालय विम्याची आवश्यकता उदाहरणासहीत स्पष्ट करा.

(०९) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० आणि ग्रंथालयांची भूमिका यावर सविस्तर विवेचन करा.

(१०) सेंसॉरशिप (Censorship) आणि ग्रंथालय आणि ग्रंथपालांची भूमिका सोदाहरण स्पष्ट करा.

(११) 'कार्य संस्कृती' (Work Culture) म्हणजे काय हे सांगून त्याचे विविध प्रकार आणि त्यात सुधारणा कशी करता येईल याबद्दल सविस्तर लिहा.

(१२) 'बिग डेटा'चा ग्रंथालयातील उपयोग आणि त्याचा प्रभाव याचे उदाहरणासहीत विवेचन करा.

(१३) भारताच्या राष्ट्रीय डिजिटल ग्रंथालयाच्या (National Digital Library of India) कार्याचा आढावा घ्या.

(१४) Altmetrics या संकल्पनेबद्दल सविस्तर लिहा.

(१५) Evidence Based Librarianship च्या कोणत्याही एका प्रतिकृतीचे सविस्तर वर्णन करा.

(१६) Web Scale Discovery Tools यावर निबंध लिहा.

(१७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा विषय अंतर्विद्याशाखीय आहे हे त्याचा इतर विविध विषयांशी असलेला संबंध दाखवून स्पष्ट करा.

(१८) Industry 4.0 चा ग्रंथालयांवर झालेला परिणाम विशद करा.

(१९) संशोधनातील वाड्‌:मयचौर्य ( Plagiarism ) शोधून काढण्याच्या कोणत्याही एका प्रणालीबद्दल सविस्तर लिहा.

(२०) केंद्र सरकारच्या 'वन नेशन वन सबस्क्रीप्शन' या धोरणाचे फायदे तोटे लिहा.

(२१) NDLI चे योगदान स्पष्ट करा.

(२२) Artificial Intelligence in Libraries याबाबत सविस्तर चर्चा करा.

(२३) DOAJ याबद्दल चर्चा करा.

(२४) Remote Access Platform (दुरवर्ती नियंत्रण पद्धत) याविषयी निबंध लिहा.

(२५) 'शोधगंगा' आणि 'शोधगंगोत्री' यांचे संशोधकांच्या दृष्टीने महत्त्व विशद करा.

(२६) वेब २.०, ३.०, आणि ४.० याबद्दल तुलनात्मक अभ्यास करा/यांचा ग्रंथालयात कशा प्रकारे वापर करता येईल याचा आढावा घ्या.

(२७) सोशल मिडियाचा वापर ग्रंथालयीन सेवा पुरवताना कशा प्रकारे करता येईल याचे विवेचन करा.

(२८) वाड्‌:मयचौर्य म्हणजे काय? ते सांगून वाड्‌:मयचौर्याबाबत UGC चे धोरण स्पष्ट करा.

(२९) इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा वापर व व्यवस्थापन याबद्दल सखोल चर्चा करा.

(३०) नवीन राष्ट्रीय धोरणामध्ये ग्रंथालयांचे योगदान स्पष्ट करा.

(३१) ग्रंथालय वर्गीकरणाच्या विविध पद्धतीबद्दल चर्चा करा.

(३२) ग्रंथालयाचे आर्थिक व्यवस्थापन कशा प्रकारे करता येईल याचे विवेचन करा.

(३३) संशोधन व संशोधक यामध्ये ग्रंथपाल हा महत्वाचा दुवा आहे या विधानाबाबत चर्चा करा.

(३४) 'स्टॉक व्हेरीफिकेशन'चे महत्त्व विशद करून त्याच्या विविध पद्धतीबद्दल माहिती द्या.

(३५) CHAT GPT हि संकल्पना स्पष्ट करा.

# ६. शोधनिबंध लिहिताना

## अध्ययनार्थ्यांना निबंध लिहिण्याविषयी व सादर करण्याबाबत सूचना

(१) सार, शोधसंज्ञा, (२) विषयप्रवेश, (३) प्रस्तावना या तीन मुद्यांनी सुरुवात करावी.

- निबंधात आवश्यक तेथे आकृत्या, तक्ते, चित्रे यांचा वापर करावा.

- परिशिष्टे असणे आवश्यक. एका परिशिष्टात वाचनसाहित्य, वेबसाईट्स यांची सूची प्रमाणित स्वरूपात द्यावी.

(२) प्रत्येक अध्ययनार्थ्याने एका विषयावर निबंध लिहावयाचा आहे. निबंधाची मर्यादा २५००–३००० शब्दांची आहे. अवतरणे, आकडेवारी व मते यांस प्रत्येक पानावर टिपेत संदर्भ देणे आवश्यक आहे. तो शास्त्रशुद्ध रितीनेच दिलेला असावा.

(३) कमी अध्ययनार्थी असलेल्या केंद्रावर अध्ययनार्थ्यांनी उर्वरित विषयांपैकी अतिरिक्त निबंध लिहिल्यास त्याचे स्वागतच होईल.

(४) अध्ययनार्थ्यांनी विषय काळजीपूर्वक वाचावा व त्यावरच निबंध लिहावा.

(५) आता विषय देताना प्रश्नांच्या स्वरूपात दिलेले आहेत. अध्ययनार्थ्यांनी योग्य ते शीर्षक देऊन निबंध सादर करावयाचा आहे.

(६) सामान्यपणे बरेचसे विषय अध्ययन साहित्यातील एका पुस्तकाशी निगडित आहेत. मात्र संपूर्ण पुस्तकाचे आकलन झाल्याशिवाय निबंध लिहिता येणार नाही.

(७) निबंधात प्रास्ताविक, पार्श्वभूमीवजा मजकूर कमीत कमी (५०० शब्दांपेक्षा कमी) आणि बहुतांशी मजकूर (२००० ते २५०० शब्द) प्रत्यक्ष विषयावर असावा. उदाहरणे नेमकी व अत्यावश्यक असतील अशीच असावीत.

(८) निबंधाच्या दोन प्रती काढाव्यात.

(९) निबंध पुढीलप्रमाणे सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| (अ) | विषयाची ओळख | २ मिनिटे |
| (आ) | ग्रंथालयशास्त्र विषयाच्या दृष्टीने विषयाचे महत्त्व | २ मिनिटे |
| (इ) | निबंधाची मांडणी | २ मिनिटे |
| (ई) | निबंधातील महत्त्वाचे मुद्दे | ५ मिनिटे |
| (उ) | सभागृहात चर्चा व्हावी असे मुद्दे | ४ मिनिटे |
| | **एकूण** | **१५ मिनिटे** |

यानंतर इतर अध्ययनार्थी प्रश्न विचारतील. त्यानंतर शिबिरतज्ज्ञ त्या विषयात मार्गदर्शन करतील.

(एका विषयावर एका अध्ययनार्थ्याने निबंध लिहिला तरी सर्व विषय सर्व अध्ययनार्थ्यांसाठी अभ्यासाचे असल्याने प्रत्येक अध्ययनार्थ्याने इतर सर्व विषयांवर निबंध सादर करणाऱ्या अध्ययनार्थ्यास विचारण्यासाठी एकेक प्रश्न तयार ठेवावा, म्हणजे अर्थपूर्ण चर्चा होऊ शकेल.)

सादर झालेल्या निबंधांपैकी जे निबंध उत्तम दर्जाचे वाटतील ते तज्ज्ञांच्या शिफारशीसह अथवा तज्ज्ञांनी केलेल्या सुधारणा करून विद्यापीठ मुख्यालयातील उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बर्वे (librarian@ycmou.digitaluniversity.ac) यांच्याकडे पाठवावेत. सर्व केंद्रांवरील उत्तम निबंधांचा संग्रह प्रकाशित करता येईल.

शिबिराच्या प्रत्येक दिवशी दुसऱ्या भागात प्रकल्पाची चर्चा होईल. प्रत्येक अध्ययनार्थ्यांस अर्धा तास दिला जाईल त्यामध्ये अध्ययनार्थ्याने –

(१) प्रकल्पविषयाची ओळख व पार्श्वभूमी बाबतच्या प्रकरण (क्र.२) चा सारांश — ४ मिनिटे

(२) प्रकल्पविषयावर किती व कोणते वाचन केले? — ४ मिनिटे

(३) माहिती संकलनात किती प्रगती आहे? उर्वरित कामे कशी पूर्ण करणार? — ४ मिनिटे

(४) आजवर मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले का? कोणते? केले नसल्यास का केले नाही? केव्हा पूर्ण करणार? — २ मिनिटे

(५) विश्लेषण केले असल्यास प्राथमिक निष्कर्ष मिळाले का? कोणते? इत्यादी माहिती द्यावयाची आहे.

यानंतरच्या १० मिनिटांमध्ये प्रकल्पाच्या तोंडी परीक्षेची झलक मिळेल अशा रितीने तज्ज्ञ प्रश्न विचारतील.

## ७. शिबिराचे दैनंदिन वेळापत्रक

| *वेळ* | *पहिला दिवस* | *दुसरा दिवस* | *तिसरा दिवस* |
|---|---|---|---|
| सकाळी ०८.०० ते ०८.३० | प्राथमिक माहिती, परिचय इ. | निबंध क्र. ८ | निबंध क्र. १६ |
| सकाळी ०९.०० ते ०९.३० | निबंध क्र. १ | निबंध क्र. ९ | निबंध क्र. १७ |
| सकाळी ०९.३० ते १०.०० | निबंध क्र. २ | निबंध क्र. १० | निबंध क्र. १८ |
| सकाळी १०.०० ते १०.३० | निबंध क्र. ३ | निबंध क्र. ११ | निबंध क्र. १९ |
| सकाळी १०.३० ते ११.०० | चहा | चहा | चहा |
| सकाळी ११.०० ते ११.३० | निबंध क्र. ४ | निबंध क्र. १२ | निबंध क्र. २० |
| सकाळी ११.३० ते १२.०० | निबंध क्र. ५ | निबंध क्र. १३ | निबंध क्र. २१ |
| दुपारी १२.०० ते १२.३० | निबंध क्र. ६ | निबंध क्र. १४ | निबंध क्र. २२ |
| दुपारी १२.३० ते ०१.०० | निबंध क्र. ७ | निबंध क्र. १५ | निबंध क्र. २३ |
| दुपारी ०१.०० ते ०२.०० | भोजन | भोजन | भोजन |
| दुपारी ०२.०० ते ०६.०० | प्रकल्प सादरीकरण १ ते ८ विद्यार्थी | प्रकल्प सादरीकरण ९ ते १५ विद्यार्थी | प्रकल्प सादरीकरण १६ ते उर्वरित सर्व विद्यार्थी |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.Lib. & I.Sc.)

### *(ऐच्छिक विषयाची निवड व प्रकल्प)*

(०१) अध्ययन सहाय्यता केंद्र संकेतांक व नाव : ..............................

(०२) अध्ययनार्थ्याचे नाव : ..............................

पत्ता : ..............................

.............................. दूरध्वनी क्र. (एसटीडी कोडसह) : ..............................

गाव .............................. तालुका ..............................

जिल्हा .............................. पिन कोड : ☐☐☐☐☐☐

(०३) कायम नोंदणी क्रमांक : ..............................

LIB 201 ☐ LIB 202 ☐ LIB 203 ☐

(LIB 201, LIB 202, LIB 203 यांपैकी कोणतेही दोन.)

(१) निवडलेले ऐच्छिक विषय १. ..............................

२. ..............................

**(सूचना : ऐच्छिक विषयांची एकदा निवड केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही.)**

(२) प्रकल्पाचे शीर्षक : ..............................

..............................

(०४) (अ) शिबिर उपस्थिती : होती ☐ / नव्हती ☐

(आ) संगणक प्रात्यक्षिकांची ७० % उपस्थिती : आहे ☐ / नाही ☐

(इ) प्रकल्प केंद्रावर मुदतीत सादर करणे : सादर केला आहे ☐ / सादर केला नाही ☐

(ई) शिबिर उपस्थिती व संगणक प्रात्यक्षिक उपस्थिती प्रमाणपत्र : सोबत जोडले आहे ☐ / नाही ☐

सदर अध्ययनार्थ्याने विद्यापीठ नियमांचे पालन केले असून/केले नसून सदर अध्ययनार्थ्यास लेखी व प्रात्यक्षिकास बसण्यास अनुमती देण्यात यावी/देण्यात येऊ नये.

सही
केंद्रप्रमुख (प्राचार्य)
शिक्का

केंद्र संयोजक
शिक्का

सदर माहिती अध्ययन सहाय्यता केंद्राकडे अध्ययनार्थ्यांनी २० मार्चपर्यंत सादर करावी आणि सर्व अध्ययनार्थ्यांची माहिती एकत्र करून ३० मार्चपर्यंत अध्ययन सहाय्यता केंद्रांनी विद्यापीठ मुख्यालयाला पाठवावी म्हणजे अध्ययनार्थ्यांना विहित कालावधीत परीक्षा हॉल तिकिटे मिळू शकतील.

**अध्ययनार्थ्याची सही:**

**दिनांक :** / /२०२

**ठिकाण :**

**केंद्रसंयोजकांची सही :**

**दिनांक :** / /२०२

**ठिकाण :**

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.Lib. & I.Sc.)**

शैक्षणिक वर्ष : २०२३ - २०२४

## प्रकल्प विषय आणि मार्गदर्शक निश्चिती

अध्ययन सहाय्यता केंद्राचा संकेतांक व नाव : ------------------------------------------------

अध्ययनार्थ्याचे नाव : ------------------------------------------------

पत्ता : ------------------------------------------------

------------------------------------------------

प्रकल्पाचे शीर्षक : ------------------------------------------------

मार्गदर्शकाचे नाव : ------------------------------------------------

स्वाक्षरी :

(१) अध्ययनार्थी

(२) मार्गदर्शक

(३) केंद्रसंयोजक

शिबिरतज्ज्ञाचे नाव व स्वाक्षरी : (१)

(२)

# विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*